" कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक सहकारी दूध संघांचा ऐतिहासिक अभ्यास "- (१९६० ते २०१५)

प्रस्तावना :

सहकारी संकल्पना मानवाच्या सहजीवनातून उदयास आली. सहकाराची कल्पना आणि सहकाराची प्रवृत्ती भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. मात्र आधुनिक अर्थाने सहकारी चळवळीचा उगम १९ व्या शतकात युरोप मध्ये झाला. युरोपमधील औद्योगिक क्रांतीनंतर सहकार या संकल्पनेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जावू लागले. औद्योगिक क्रांती व यंत्राचा वाढता वापर यामुळे समाजात अमुलाग्र बदल झाला. समाजात भांडवलदार व मजूर असे दोन वर्ग निर्माण झाले. कामगारांच्या जीवनावर ते प्रतिकूल परिणाम झाले त्याची प्रतिक्रिया म्हणून सहकारी संघटन अधिक बळकट होत गेले. कामगारांना अधिक चांगले जीवन जगण्यासाठी खऱ्या अर्थाने इंग्लंडमध्ये १८४४ मध्ये रॉबर्ट ओवेन याने सहकार चळवळीची स्थापना केली. भारतामध्ये १९०४ च्या सहकारी संस्था कायद्याच्या संमती नंतर सहकारी चळवळ सुरू झाली. आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी गेल्या दोन दशकापासून भांडवलशाही आणि साम्यवादी अर्थव्यवस्था उपयुक्त ठरत असल्या तरी त्यामधील दोष आज स्पष्ट दिसून आले आहेत. त्यासाठी आर्थिक प्रश्नांचो उकल करण्याकरीता सहकारी अर्थव्यवस्था प्रभावी माध्यम ठरत आहे. या सहकारी संस्थांमध्ये साखर कारखाने, बँका, दूध संघ यांचे योगदान मोलाचे ठरत आहे.

भारतात सध्या १७७ मिल्क युनियन, १५ मिल्क मार्केटिंग फडरेशन, १,४४,२४६ प्राथमिक सहकारी दूध संस्था आहेत. देश पातळीवर १.५ कोटी व्यक्ती दुग्धव्यवसायाशी जोडल्या आहेत. यापैकी जवळपास ४० लाख महिला आहेत. जगात दुधउत्पादन अनेक वर्षे मक्तेदारी असणाऱ्या प्रथम स्थानावरील अमेरिकेला दुसऱ्या क्रमांकावर ढकलून भारताने प्रथम क्रमांकाची जागा घेतली आहे. पशुसंवर्धनात ब्राझीलनंतर भारताचा क्रमांक

लागतो. जगातील पशुधनाच्या १७ टक्के पशुधन भारताकडे आहे.१९७० मध्ये भारत सरकारने 'ऑपरेशन फ्लड ' ही योजना सुरू केली. त्यामुळे देशात व राज्यात मोठ्या प्रमाणात दुग्धक्रांती यशस्वी झाल्याचे दिसते.

विषय निवडीचे महत्व :

काल्हापूर जिल्ह्यात सहकारी दूध संघानी व खाजगी दूध संघांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणले आहेत. यापैकी कोल्हापूर जिल्हा दूध संघ (गोकुळ), वारणा व यळगूड या सहकारी दुधसंघाचा अग्रक्रम लागतो. त्यामुळे या तीन दूध संघाचा अभ्यास केला जाणार आहे. भारताच्या संदर्भात ग्रामीण भागातील सावकारी व वारंवार येणारे दुष्काळ त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी बिकट आर्थिक हलाखी आणि सावकारी पिळवणूक यामधून सहकाराचा जन्म झाला. सहकाराच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यात गोकुळ, यळगुड आणि वारणा या सहकारी दूध संघांची स्थापना सत्तरच्या दशकात झाली.

१९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यात दुग्धविकास कार्याला चालना मिळाली. तत्कालीन महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी कृषी, औद्योगिक क्रांतीच्या नव्या धोरणाची घोषणा केली. या धोरणातूनच महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखाने, सुतगिरणी, जिल्हा बँका, पतसंस्था उदयास आल्या. त्याचवेळी गावोगावी शेतकरी दूध उत्पादकांच्या सहकारी संस्था निर्माण झाल्या व त्यांनी यातूनच पुढे तालुका व जिल्हा दूध संघांची स्थापना केली. महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या दूध संघाचे वर्गीकरण सरकारी, सहकारी व खाजगी असे करता येईल.

दूध व्यवसायात महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या दूध उत्पादन संस्थांचे वर्गीकरण ग्रामीण किंवा तालुका पातळीवर काम करणाऱ्या दूध उत्पादन सहकारी संस्था आणि जिल्हा पातळीवर कार्यरत असणारे दूध सघ आहेत. खेडोपाड्यातून दूध संकलित करून वरील दूध

संघात संकलित होवून ग्राहकांना मागणीनुसार त्याचा खेडी आणि शहर येथे विक्री व पुरवठा होतो. या संघाच्या माध्यमातूनच ग्रामीण शेतकरी हा शहरी ग्राहकांशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो. संघामाफत संकलित दुधावर प्रक्रिया करून दही, तुप, लोणी, चिज, लस्सी, बेकरीची उत्पादने इत्यादी तयार करून बाजारपेठेत विकली जातात. कोल्हापूर जिल्हा हा म्हशीचे सर्वाधिक दूध उत्पादन करणारा राज्यातीलच नव्हे तर देशातील अगसर जिल्हा आहे.

स्वर्गीय आनंदराव पाटील-चुयेकर यांनी १६ मार्च, १९६३ रोजी 'कोल्हापूर जिल्हा दूध संघाची' स्थापना केली. स्थापनेवेळी दैनंदिन केवळ २०० लिटर्स दूध संकलन होते.मात्र संघाची सन २०१४-१५ ची वार्षिक उलाढाल १३०० कोटी रूपयाच्या घरात पोहचली आहे. तर दैनंदिन संकलन सुमारे ८ ते ९ लाख लिटर्सच्या घरात आहे. 'अमुल' (गुजरात) नंतर देशात 'गोकुळ' चा दूध संकलनात क्रमांक लागतो. आय.एस.ओ. ९००१:२००८ व आय.एस.ओ.२२०००:२००५ मानांकन प्राप्त संघास १४ राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. २०१४ हे वर्ष गोकुळने सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले.

सहकाररत्न श्री.वसंतराव मोहिते यांनी १४ जुलै,१९६७ रोजी 'हनुमान दूग्ध व्यवसायिक व कृषीपुरक संस्थेची स्थापना केली. हा संघ 'यळगुड' म्हणून प्रसिध्दीस आला. ४८ कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल असणाऱ्या या संघाचे वार्षिक दूध संकलन २७ लाख लिटर्सच्या घरात आहे. संघाने 'सहकार' नावाने बेकरी तर 'यळगुड' नावाने डेअरी उत्पादने बाजारत आणून बाजारपेठेत वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे.

सहकारमहर्षी स्वर्गीय तात्यासाहेब कोरे यांनी बागायतदार शेतकऱ्यांबरोबरच अल्पभूधारक, कोरडवाहू क्षेत्रातल्या शेतकऱ्याला पुरकव्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसाय मिळावा या हेतूने २० जूलै,१९६८ रोजी 'श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघाची' स्थापना जिल्ह्यातील वारणानगरजवळील अमृतनगर येथे केली. संघाची सन २०१४-१५ ची वार्षिक उलाढाल ४०० कोटी रूपयांच्या घरात तर दैनंदिन दूध संकलन ३ ते ४ लाख लिटर्सच्या घरात आहे. हा संघ आपली दुग्धजन्य उत्पादने आखाती देश, आफ्रिकन देश व

चीन या देशात निर्यात करतो. त्याचबरोबर कॅडबरीपासून ते दिल्लीच्या मदर डेअरीची अनेक उत्पादने तयार करून देतो.

वरील तिन्ही सहकारी दूध संघामार्फत दूध उत्पादक शेतकऱ्यांना चांगली जातीवंत दुभती जनावरे खरेदीसाठी वेगवेगळ्या बँका, पतसंस्था यांच्याकडून संस्थेच्या हमीवर कर्ज उपलब्ध करून दिली जातात. या कर्जाची परतफड दूध बिलातून करून घेतली जाते. सहकारी संघाच्या माध्यमातून सहकारी उद्योगसमूह आकारास येत असून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी दूध संघांचा कॉमर्स, अर्थशास्त्र व भूगोल या विषयातून अभ्यास झाला आहे. परंतू ऐतिहासिक दृष्टिकोनातून या सहकारी दूध संघांचा अभ्यास झालेला नाही. म्हणूनच संशोधकाला हा अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

संशोधनाची उद्दिष्ये :

सशोधकाने निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने खालील उद्दिष्ट्चे समोर ठेवली आहेत.

१. दूध पुरवठा करणाऱ्या सर्वसामान्य दूध उत्पादकांच्या जीवनात सहकारी दूध संघाच्यामुळे झालेल्या सामाजिक बदलांची माहिती घेणे.
२. दूध पुरवठा करणाऱ्या सर्वसामान्य दूध उत्पादकांच्या जीवनात सहकारी दूध संघामुळे झालेल्या आर्थिक बदलांची माहिती घेणे.
३. सहकारी दूध संघाच्या उभारणीमुळे रोजगाराच्या प्रश्नांची झालेली सोडवणूक अभ्यासणे.
४. दूध संघांच्या विविध सहाय्यकारी दुग्धजन्य उत्पादनांचे बाजारपेठेतील स्थान अभ्यासणे.
५. संघांनी राबवलेल्या शेतकरी हिताच्या योजनांचा अभ्यास करणे.
६. दूध संघांच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले उपक्रम अभ्यासणे.

७. दूध संघाच्या संस्थापकांच्या योगदानातून सहकारी दूध संघांच्या निर्मितीमागील जनहित दृष्टिकोनातून त्यांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकणे.
८. उदरनिर्वाहाचे साधन, बेकारी, महागाई, आणि प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम या तत्वानुसार दूध व्यवसायाचे महत्व विशद करणे.

गृहितके :

१. सहकारी दूध संघांच्या स्थापनेपासून टप्प्याटप्प्याने परिसराचा सर्वांगीण विकास झाला आहे.
२. दूध उत्पादन व दुधाबरोबरच दुग्धजन्य उत्पादनांची मागणी आणि पुरवठा यांची संघानी योग्य सांगड घातली आहे.
३. गोकुळ, वारणा, यळगुड संघाचे बाजारपेठेतील स्थान अजोड आहे.
४. तिन्ही दूध संघानी सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून विकास साधला आहे.
५. दूध व्यवसायापूर्वी शेतीला पुरक जोडधंदा म्हणून ओळखला जात होता. सध्या ता एक किफायतशीर स्वतंत्र उद्योग अथवा व्यवसाय म्हणून ओळखला जात आहे.
६. बँका, पतसंस्था, व विकास सेवा संस्था यांच्या बरोबरीनेच सहकारी दूध संघांचे योगदान महत्वाचे आहे.
७. सहकारी दूध संघानी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या रोजगार पुरवून बेरोजगारी कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

संशोधन पद्धती :

सदर विषयाचे संशोधन पूर्ण करण्यासाठी प्राथमिक, दुय्यम साधनांचा गरजेनुसार उपयोग करून घेता येणार आहे. त्याचबरोबर संशोधन पद्धती, प्रश्नावली पद्धती, मुलाखत तंत्र यांचा आधार देऊन संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

कोल्हापूर जिल्हा गॅझेटीयर, दुधसंघाच्या स्मरणिका, वार्षिक अहवाल, स्थानिक ग्रंथालये, यांचा संशोधनासाठी उपयोग करून घेता येईल.

प्रकरणनिहाय आराखडा :

१.जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी :

कोल्हापूर जिल्हा भौगोलिकदृष्ट्या समृद्ध असा आहे. जिल्ह्यास इतिहासाचाही मोठा वारसा लाभला आहे. ही समृद्ध पार्श्वभूमी जिल्ह्यातील दूध संघांना फायदेशीर ठरली आहे. याचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

२. दुधसंघाचा उदय व विकास :

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर कोल्हापूरात दूध संघाची स्थापना झाली. सहकारी दूध संघांचा उदय याच काळात झाला. संघांनी दूध उत्पादकांच्यासाठी राबविलेल्या योजना आणि भूमिका यामुळे जिल्ह्याचा व परिसराचा विकास घडून आला. याचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

३. दूध संघाची सहाय्यकारी दुग्धजन्य उत्पादने :

दूध संघानी दूध संकलन आणि वितरण याचबरोबर दुधापासून दूध पावडर, दही, तुप, लोणी, चिज, श्रीखंड, लस्सी, पनीर, बेकरीची उत्पादने तयार करून आपला लौकिक निर्माण केला आहे. यातून कोट्यवधी रूपयांची उलाढाल होते. या उत्पादनानी राज्य, आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला ठसा उमटवला आहे. याचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

४. दूध उत्पादकांच्या जीवनात घडून आलेला आर्थिक व सामाजिक बदल :

जिल्ह्यातील गोकुळ, वारणा व यळगुड या दूध संघांनी जिल्ह्यात धवलक्रांती घडवून आणली आहे. दूध व्यवसाय सामान्य, कष्टकरी आणि अल्पभूधारकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. यामुळेच या घटकांचा आर्थिक व

सामाजिकस्तर उंचावण्यास मदत झाली. या बदलांचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

५. निष्कर्ष :

प्रकरण एक ते चार यांच्या अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येतील.

संदर्भ साधने :

१. कि.का. चौधरी (संपा), 'कोल्हापूर जिल्हा गॅझेटीयर', दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, १९८९.

२. कोरे तात्यासाहेब (शब्दांकन डॉ. मुकुंद दातार व श्री विजय पानसरे), ' मी : एक कार्यकर्ता ', प्रकाशक स.आ. गुळवणी, प्रथम आवृत्ती,१९९०.

३. डॉ.रूपा शहा, डॉ.दामजी, 'सहकारी विकास', फडके प्रकाशन कोल्हापूर.

४. पाटील एम.डी. 'सहकार दासबोध', रूईकर कॉलनी कोल्हापूर

५. डॉ.कामत जी.एल, 'सहकार तत्वविहार', विद्या प्रकाशन पुणे, १९७९.

६. नरके अरूण, ' गोकुळ गाथा ', २०१५.

७. दूध संघांचे वार्षिक अहवाल.

८. दूध संघांच्या स्मरणीका.

९. योजना.

१०. धवलक्रांतीचा दिपस्तंभ.

११. वृत्तपत्रे.

12. V.Kurien, 'An Unfinished Dream', Tata McGraw Hill Publishing Co.New Delhi.

13. V.Kurien, 'I Too Had A Dream'.

14. Dr. A.M.Gurav, ‘Challenges Before Dairy Co- Operative’.
15. Dr. V. Kulanandiswary, ‘Co- Operative Dairying in India’, Rainbow Publishing Coimbatour ,1982.
16. Bando Padya M.K, ‘Dairy Co-operatives and Rural Development’, Uppal Publishing House New Delhi, 1994.
17. Indian Dairyman.
18. Internet.

प्रा. दत्तात्रय रंगराव पाटील
संशोधक
दे.आ.ब.नाईक कॉलेज,चिखली
ता.शिराळा, जि.सांगली

डॉ.आर.डी. गंगथडे
मार्गदर्शक
के.टी.पवार कॉलेज, हडोळती
ता.अहमदपूर, जि.लातूर